# अपर पोलीस महासंचालक व संचालक कार्यालय,
# पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे.

संकेतस्थळ : mahpolwireless.gov.in ईमेल : dirpolwireless.pune@nic.in

फॅक्स : (020) 25657974 दूरध्वनी : (020) 25652505


क्र.ई-04/पदोन्नती/पोशि (कम) ते पोना(कम)/2017/4416 पुणे, दिनांक : 31 / 08 /2017

विषय :- पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) यांचे पोलीस नाईक (कर्मशाळा मदतनीस) या पदावरील पदोन्नतीवर नेमणुकीबाबत.
**(निवड सुची सन 2016-2017)**

--- 000 ---

**आदेश :-**

पोलीस बिनतारी संदेश विभागातील खालील नमुद पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) यांना, कार्यभार ग्रहण केल्याच्या तारखेपासून, पोलीस नाईक (कर्मशाळा मदतनीस) या पदावर स्थानापन्न व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची **(Provisional)** पदोन्नती देऊन, त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या ठिकाणी पदोन्नतीवर पदस्थापना करण्यात येत आहे.

पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) :- वेतनश्रेणी रु.5200-20200/- अधिक श्रेणी वेतन रु.1800/-
पोलीस नाईक (कर्मशाळा मदतनीस) :- वेतनश्रेणी रु.5200-20200/- अधिक श्रेणी वेतन रु.2400/-

| अ. क्र. | पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) यांचे नांव व जातीचा प्रवर्ग | सध्याची नेमणूक व आस्थापना | पदोन्नतीवरील नेमणूकीचे ठिकाण व आस्थापना | पदोन्नती कोणत्या प्रवर्गातून | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 01 | श्री.फडतरे दत्तात्रय सर्जेराव **मराठा (खुला)** | **गोनपायो** संचालक आस्थापना, पुणे | संचालक आस्थापना, पुणे | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 02 | श्री.देसाई प्रमोद जयसिंगराव **मराठा (खुला)** | **ठाणे शहर** पोलीस आयुक्त, ठाणे शहर | **मुंबई शहर** पोलीस आयुक्त, मुंबई शहर | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 03 | श्री.पाटील मच्छिंद्र गोबा **मराठा (खुला)** | **नवी मुंबई** पोलीस आयुक्त, नवी मुंबई | **मुंबई शहर** पोलीस आयुक्त, मुंबई शहर | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 04 | श्री.पाटील रविंद्र काशिनाथ **मराठा (खुला)** | **नंदूरबार** पोलीस अधीक्षक, नंदूरबार | **नंदूरबार** पोलीस अधीक्षक, नंदूरबार | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 05 | श्री.पाटील प्रभाकर रामभाऊ **मराठा (खुला)** | **मुंबई शहर** पोलीस आयुक्त, मुंबई शहर | **मुंबई शहर** पोलीस आयुक्त, मुंबई शहर | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 06 | श्री.पाटील राजेंद्रकुमार पांडूरंग **मराठा (खुला)** | **औरंगाबाद शहर** पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर | **जालना** पोलीस अधीक्षक, जालना | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 07 | श्री.घुले भगवान धोंडिराम **मराठा (खुला)** | **हिंगोली** पोलीस अधीक्षक, हिंगोली | **परभणी** पोलीस अधीक्षक, परभणी | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 08 | श्री.पठाण अकबर निजामखाँ **मुस्लिम (खुला)** | **परभणी** पोलीस अधीक्षक, परभणी | **परभणी** पोलीस अधीक्षक, परभणी | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 09 | श्री.दौड विठ्ठल भाऊराव<br>**मराठा (खुला)** | **औरंगाबाद शहर**<br>पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर | **नाशिक ग्रामीण**<br>पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 10 | श्री.नागमोडे अनंत संपतराव<br>**ईलम (इमाव)** | **लातूर**<br>पोलीस अधीक्षक, लातूर | **सोलापूर ग्रामीण**<br>पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 11 | श्री.तिलंगे भारत माणिक<br>**कंजार (विजा-अ)** | **मुंबई शहर**<br>पोलीस आयुक्त, मुंबई शहर | **मुंबई शहर**<br>पोलीस आयुक्त, मुंबई शहर | वि.जा.-अ प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 12 | श्री.धनाईत दत्तात्रय विष्णूपंत<br>**माळी (इमाव)** | **औरंगाबाद शहर**<br>पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर | **बुलडाणा**<br>पोलीस अधीक्षक, बुलडाणा | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 13 | श्री.चांदेकर कामराज उद्धवराव<br>**महार (अनुसूचित जाती)** | **घोट, गडचिरोली**<br>पोलीस अधीक्षक, गडचिरोली | **ठाणे शहर**<br>पोलीस आयुक्त, ठाणे शहर | अनुसूचित जाती प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 14 | श्री.गोंडाले विजय कृष्णाजी<br>**कुणबी (इमाव)** | **आरमोरी, गडचिरोली**<br>पोलीस अधीक्षक, गडचिरोली | **ठाणे शहर**<br>पोलीस आयुक्त, ठाणे शहर | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 15 | श्री.शेख हैदर मोहमद पाशा<br>**मुस्लिम (खुला)** | **अहेरी, गडचिरोली**<br>पोलीस अधीक्षक, गडचिरोली | **गडचिरोली**<br>पोलीस अधीक्षक, गडचिरोली | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 16 | श्री.वानखेडे मनोहर पंजाबराव<br>**कुणबी (इमाव)** | **नागपूर ग्रामीण**<br>पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण | **नागपूर ग्रामीण**<br>पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 17 | श्री.झाडे देवदास सखाराम<br>**कुणबी (इमाव)** | **धानोरा, गडचिरोली**<br>पोलीस अधीक्षक, गडचिरोली | **मुंबई शहर**<br>पोलीस आयुक्त, मुंबई शहर | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 18 | श्री.शेंडे विठ्ठल बुधाजी<br>**माळी (इमाव)** | **अहेरी, गडचिरोली**<br>पोलीस अधीक्षक, गडचिरोली | **मुंबई शहर**<br>पोलीस आयुक्त, मुंबई शहर | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 19 | श्री.वढाई भोजराज पांडूरंग<br>**महार (अनुसूचित जाती)** | **गडचिरोली**<br>पोलीस अधीक्षक, गडचिरोली | **मुंबई शहर**<br>पोलीस आयुक्त, मुंबई शहर | अनुसूचित जाती प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 20 | श्री.कुमरे रुमाचंद केदार<br>**गौंड (अनुसूचित जमाती)** | **गडचिरोली**<br>पोलीस अधीक्षक, गडचिरोली | संचालक आस्थापना पुणे | अनुसूचित जमाती प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 21 | श्री.अरमरकर राजेंद्र मुरलीधर<br>**सोनार (इमाव)** | **नागपूर शहर**<br>पोलीस आयुक्त, नागपूर शहर | **मुंबई शहर**<br>पोलीस आयुक्त, मुंबई शहर | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 22 | श्री.तारे पंडित गंगाधर<br>**मराठा (खुला)** | **परभणी**<br>पोलीस अधीक्षक, परभणी | **मुंबई शहर**<br>पोलीस आयुक्त, मुंबई शहर | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 23 | श्री.रुमकर गजानन रामदास<br>**लोहार (भज-ब)** | **अमरावती ग्रामीण**<br>पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण | **मुंबई शहर**<br>पोलीस आयुक्त, मुंबई शहर | भ.ज.-ब प्रवर्गातून | रिक्त पदावर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 24 | श्री.पौळ एकनाथ बापुराव **मराठा (खुला)** | **परभणी** पोलीस अधीक्षक, परभणी | **कोल्हापूर** पोलीस अधीक्षक, कोल्हापूर | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 25 | श्री.माने तानाजी सदाशिव **मराठा (खुला)** | **कोल्हापूर** पोलीस अधीक्षक, कोल्हापूर | **कोल्हापूर** पोलीस अधीक्षक, कोल्हापूर | खुल्या प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 26 | श्री.धांडेकर दयाराम म्हातिंग **कोरकू (अनूसूचित जमाती)** | **अमरावती ग्रामीण** पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण | **मुंबई शहर** पोलीस आयुक्त, मुंबई शहर | अनुसूचित जमाती प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 27 | श्री.कोमटी अशोक नारायण **भामटी (विजा-अ)** | **नागपूर शहर** पोलीस आयुक्त, नागपूर शहर | **रायगड** पोलीस अधीक्षक, रायगड | वि.जा.-अ प्रवर्गातून | रिक्त पदावर |
| 28 | श्री.मैंदाड सुनिल शिवाजीराव **धनगर (भज-ब)** | **पुणे ग्रामीण** पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण | संचालक आस्थापना, पुणे | भ.ज.-क प्रवर्गातून | रिक्त पदावर |

2. सदरची पदोन्नती ही खालील अटी व शर्तीचे अधीन राहून देण्यात येत आहे.

01) मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.8452/2004 मध्ये दिनांक 09/03/2007 रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दिनांक 28/03/2008 रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या पदावरील सर्व पदोन्नत्या या मूळ याचिका क्र.8452/2004 च्या निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे. तसा स्पष्ट पदोन्नतीच्या आदेशामध्ये उल्लेख करण्यासंदर्भात शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-2001/1887/प्र.क्र.64/1/16-ब, दिनांक 01/04/2008 अन्वये शासनाने निर्देश दिलेले आहेत. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या मुंबई खंडपीठापुढे दाखल केलेला मूळ अर्ज क्र.1180/2010 मध्ये मा.न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून उपरोक्त कर्मचा-यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे.

02) उपरोक्त पदोन्नती झालेल्या कर्मचा-यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला असेल/ निलंबनाची कार्यवाही केलेली असेल/ न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असेल, ते एखादी शिक्षा भोगत असतील तर संबंधित घटकप्रमुखांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांचेविरुद्धच्या प्रकरणाची सविस्तर माहिती या कार्यालयास फॅक्सद्वारे पाठवावी आणि पुढील आदेशाची वाट पाहावी.

03) उपरोक्त पदोन्नत कर्मचारी सध्या एखादी शिक्षा भोगत असतील अथवा देण्यात आलेल्या सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरु झालेली नाही अशा कर्मचा-यांकडून त्यांना भविष्यात होणारी शिक्षा ते पदोन्नतीच्या पदात भोगणेस तयार असल्याबाबत दिनांकीत स्वाक्षरी केलेले लेखी हमीपत्र घेऊन, सदर हमीपत्राच्या अधीन राहूनच पदोन्नतीवर सोडण्यात यावे. तसेच संबंधित कर्मचा-यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त केलेल्या आदेशातही तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. सदर आदेशाची व संबंधितांच्या लेखी हमीपत्राची प्रत या कार्यालयास सादर करावी. जर त्यांनी लेखी संमती देण्याचे नाकारल्यास तसे या कार्यालयास तात्काळ कळविण्यात यावे.

04) पदोन्नती दिलेल्या कर्मचा-यांपैकी ज्या कर्मचा-यांना सदरची पदोन्नती स्वीकारण्याची इच्छा नाही अशा कर्मचा-यांचे लेखी अर्ज 7 दिवसांत या कार्यालयात सादर करण्याची संबंधित प्रभारी अधिकारी यांनी नोंद घ्यावी.

05) पदोन्नती आदेश प्राप्त झाल्यानंतर जे कर्मचारी पदोन्नती स्वीकारणार नाहीत किंवा विविध सबबीखाली पदस्थापना स्वीकारण्यास टाळाटाळ करतील त्यांना आश्वासित प्रगती योजनेंतर्गत देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील.

06) पदस्थापनेत बदल करण्याकरीता कोणत्याही स्वरुपाचा राजकिय दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास ही बाब गंभीर ठरवून शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल.

07) पदोन्नतीनंतर संबंधित कर्मचारी पदोन्नतीच्या पदावर रुजू न झाल्यास त्यांना पदोन्नतीबाबत स्वारस्य

नसल्याचे समजून सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-2015/प्र.क्र.303/का.12, दिनांक 12/09/2016 मधील नमूद 1 ते 6 तरतूदींच्या अधीन राहून संबंधित कर्मचारी यांचे नाव निवडसूचीतून वगळण्यात येऊन पुढील पदोन्नतीसाठी विचारात घेण्यात येईल. तद्नंतर कोणत्याही परिस्थितीत त्यांची विनंती मान्य करता येणार नाही.

08) जे कर्मचारी रजेवर/ गैरहजर/रुग्णनिवेदनात असतील, ते प्रत्यक्ष कार्यभार स्वीकारलेल्या दिनांकापासून पदोन्नतीस पात्र राहतील.

09) सदरची पदोन्नतीवरील नियुक्ती महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील तरतूदीनुसार करण्यात येत आहे.

10) पदोन्नती नंतर कनिष्ठ पदातील वेतनवाढीनंतर वेतन निश्चितीकरिता द्यावयाच्या विकल्पासंबंधी शासन अधिसूचना वित्त विभाग क्रमांक वेपूर 1298/ प्रक्र-13/98/सेवा-10 दि.10/12/ 1998 च्या आदेशाची माहिती पोलीस नाईक (कर्मशाळा मदतनीस) या पदावर पदोन्नती झालेल्या कर्मचा-यास द्यावी. असा विकल्प द्यावयाचा असेल तर त्यांनी पदोन्नती मिळाल्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत असा विकल्प द्यावा. मुदतीत विकल्प न आल्यास तो ग्राहय धरला जाणार नाही व त्यांची वेतननिश्चिती म.ना.से. (वेतन ) नियम - 1981, नियम क्र.11(एक) (ए) प्रमाणे करण्यात येईल याची संबंधितांस समज द्यावी.

11) कालबद्ध पदोन्नती घेतली असल्यास संबंधित कर्मचा-यास पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती अनुज्ञेय असणार नाही. संबंधित कर्मचारी पदोन्नती स्विकारण्यास तयार नसतील तर त्यांची कालबद्ध पदोन्नती (वरिष्ठ वेतनश्रेणी) काढून घेण्यात यावी आणि त्याप्रमाणे अहवाल सादर करावा.

12) उपरोक्त पदोन्नती झालेल्या पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) यांना पदोन्नतीवरील नियुक्तीच्या ठिकाणी **तात्काळ कार्यमुक्त करुन** त्यांचा कार्यमुक्त केल्याचा दिनांक व पोलीस नाईक (कर्मशाळा मदतनीस)या पदाचा कार्यभार स्विकारल्याचा दिनांक या कार्यालयास उलट टपाली कळवावा.तसेच सदरील कर्मचारी हे पदोन्नतीवर बदली झालेले ठिकाणी या आदेशाचे तारखेनंतर एक महिन्याचे आत हजर न झाल्यास त्यांची सेवाज्येष्ठता ते पदोन्नतीवर हजर होतील त्या दिनांकापासून धरणेत येईल. तसेच संबंधित आस्थापना अधिकारी यांनी पदोन्नती झालेल्या कर्मचा-यांच्या सेवापटामध्ये पदोन्नतीच्या आदेशाचा क्रमांक व दिनांकाची नोंद घ्यावी.

3. **पदोन्नती झालेल्या सर्व पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) यांचे आम्ही अभिनंदन करीत आहोत आणि पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा देत आहोत.**

**( रितेश कुमार )**
अपर पोलीस महासंचालक व संचालक
पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रति**

पोलीस आयुक्त, मुंबई शहर / पुणे शहर / ठाणे शहर / नागपूर शहर / नवी मुंबई / औरंगाबाद शहर
पोलीस अधीक्षक, नंदूरबार/ जालना/नाशिक ग्रामीण/हिंगोली/परभणी/सोलापूर ग्रामीण/बुलडाणा/ लातूर/ गडचिरोली/नागपूर ग्रामीण/कोल्हापूर/अमरावती ग्रा./पुणे ग्रामीण/रायगड
पोलीस अधीक्षक, बि.सं.,पूर्व विभाग, नागपूर / पश्चिम विभाग, पुणे. / पोलीस उप आयुक्त, बि.सं.वि.मुंबई.

**प्रत :** सहायक पोलीस आयुक्त बि.सं., पुणे शहर / ठाणे शहर/नागपूर शहर/नवी मुंबई.
पोलीस उपअधीक्षक, बिसं.,कोल्हापूर परिक्षेत्र /नाशिक परिक्षेत्र /कोकण परिक्षेत्र./ संशोधन व विकास, पुणे
पोलीस निरीक्षक,बि.सं.औरंगाबाद शहर/नंदूरबार/ जालना/नाशिक ग्रामीण/हिंगोली/परभणी/सोलापूर ग्रामीण/ बुलडाणा/ लातूर/ गडचिरोली/नागपूर ग्रामीण/कोल्हापूर/अमरावती ग्रा./पुणे ग्रामीण/रायगड

**<u>स्थानिक प्रती :-</u>**

पोलीस निरीक्षक बि.सं.गोनपायो, संचालक कार्यालय, पुणे.
प्रमुख लिपिक, लेखा शाखा/ आस्थापना शाखा - 01 व 02 / भरती कक्ष (संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी)
"क" शाखा (राजपत्रकामध्ये प्रसिद्धीसाठी)